DAY — **05** SEAT NUMBER | | | | | | | |

2026	II	14	1100	**J-129**	(M)

ORGANISATION OF COMMERCE AND MANAGEMENT (51)

Time : 3 Hrs. **(7 Pages)** **Max. Marks : 80**

सूचना : *(१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.*

(२) उजव्या बाजूस दिलेले अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

(३) डाव्या बाजूस दिलेले अंक प्रश्नांचे क्रमांक दर्शवितात.

(४) प्रत्येक प्रश्नाच्या उत्तराची सुरुवात नवीन पानावर करावी.

प्र.१. **(अ)** रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा : (५) **[२०]**

(१) आयुर्विम्यास ———— तत्त्व लागू होत नाही.

(अ) विमा हित

(ब) परमोच्च विश्वासाचे

(क) नुकसान भरपाईचे

(२) ग्राहक आणि ग्राहक यांच्यातील व्यवहार ———— च्या अंतर्गत होतात.

(अ) B2B

(ब) C2C

(क) B2C

(३) व्यवस्थापनेची कार्ये ———— या कार्याने संपतात.

(अ) निर्देशन

(ब) कर्मचारी व्यवस्थापन

(क) नियंत्रण

(४) व्यवसायाने ———— वेळोवेळी माहिती पुरविली पाहिजे.

(अ) ग्राहकांना

(ब) मालकांना

(क) कर्मचाऱ्यांना

(५) किरकोळ बाजार हा असा बाजार आहे की जेथे किरकोळ व्यापारी प्रत्यक्षपणे मालाची विक्री ———— यांना लहान प्रमाणात करतो.

(अ) उत्पादक

(ब) घाऊक व्यापारी

(क) उपभोक्ता

(ब) योग्य जोड्या जुळवा : (५)

'अ' गट	'ब' गट
(अ) निर्देशनातील एकवाक्यता	(१) शेवटची पायरी
(ब) नलिकेद्वारे वाहतूक (pipeline)	(२) ग्राहक
(क) नोंदणी	(३) एक वरिष्ठ–एक योजना

(ड) आर्थिक उद्‌देश	(४) पेट्रोलियम आणि गॅस
(इ) बाजारपेठेचा राजा	(५) कर्जफेडीची क्षमता व प्रतिष्ठा
	(६) सामाजिक
	(७) सर्व क्रियांची नीट विभागणी
	(८) वेस्टर्न युनियन मनी ट्रान्सफर
	(९) नफा मिळविणे
	(१०) पहिली पायरी

(क) खालीलपैकी 'बरोबर' की 'चूक' ते लिहा : (५)

(१) लोक अदालत हे खऱ्या अर्थाने लोकांचे न्यायालय म्हणून ओळखले जाते.

(२) NEFT म्हणजे नॅशनल इलेक्ट्रिक फंड ट्रान्सफर.

(३) विपणी हा शब्द लॅटिन भाषेतील 'मार्केट्स' शब्दापासून आलेला आहे.

(४) व्यवस्थापनाचे प्रत्येक कार्य नियोजनावर आधारित नसते.

(५) औद्योगिक शांतता राखणे ही व्यवसाय संघटनांची जबाबदारी असते.

(ड) योग्य क्रम लावा : (५)

(१) खरेदी विक्री, वस्तू पोहोच अवस्था, पूर्व-खरेदी किंवा विक्री

(२) ई-मेल, आंतर्देशीय पत्र, कुरिअर सेवा.

(३) जिल्हा न्यायाधीश, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश, उच्च न्यायालयाचे न्यायाधीश.

(४) स्थानिक बाजार, आंतरराष्ट्रीय बाजार, राष्ट्रीय बाजार.

(५) नियंत्रण, संघटन, नियोजन.

प्र.२. खालील संज्ञा/संकल्पना स्पष्ट करा (कोणत्याही चार) : **[८]**

(१) मोबदला तत्त्व

(२) व्यवस्थापन

(३) संदेशवहन / संप्रेषण

(४) संघटन

(५) विमा

(६) जनहित याचिका

प्र.३. खालील घटना किंवा प्रसंगाचा अभ्यास करून आपले मत लिहा (कोणतेही दोन) : **[६]**

(१) श्री रमण एक यशस्वी उत्पादक आहेत. त्यांचे विविध ठिकाणी उत्पादनाचे कार्य चालते. ते मोठ्या प्रमाणात उत्पादनाचे कार्य करीत असल्याने त्यांच्याकडे कच्चा आणि उत्पादित मालाचा मोठ्या प्रमाणात साठा आहे. त्यांना कोणत्याही अनपेक्षित आर्थिक धोक्यापासून मालाच्या संरक्षणासंबंधी काळजी वाटते. तसेच

त्यांना कच्चा व पक्का माल एक शाखेतून दुसऱ्या शाखेत पाठवावा लागतो. परंतु त्यासाठीची कोणतीही सुविधा उपलब्ध नाही. त्यांना व्यवसाय विस्तारासाठी निधीची सुद्धा आवश्यकता आहे.

(अ) त्यांना मालाचे सर्व प्रकारच्या धोक्यापासून संरक्षण देणारी सेवा सुचवा.

(ब) कोणती सेवा त्यांना जागेचा अडथळा दूर करण्यासाठी उपयोगी ठरेल?

(क) कोणत्या सेवेद्वारे श्री रमण अर्थसहाय्य मिळवू शकतात?

(२) अजय www.flipkart.com या वेबसाईटवरून काही भेटवस्तू ऑनलाइन खरेदी करतो. त्याचवेळी शितल e.bay.com या वेबसाईटवरून भेटवस्तू खरेदी करते, तर हा व्यवहार ओळखा.

(अ) C2C शी संबंधित वेबसाईट कोणती?

(ब) B2C शी संबंधित वेबसाईट कोणती?

(क) अजयने ऑनलाइन व्यवहार करताना कोणती पहिली पायरी अनुकरण करावी?

(३) रंगाचे उत्पादन करणाऱ्या एका संस्थेने कित्येक वर्षापासून बाजारामध्ये अग्रेसर स्थान पटकाविले आहे. प्रक्रिया न केलेले विषारी स्वरूपाचे टाकाऊ पदार्थ, ते नदी किनाऱ्यावर फेकून देतात, ज्यामुळे जवळपासच्या खेडेगावांमध्ये अनेक आरोग्य विषयक समस्या निर्माण झालेल्या आहेत.

(अ) रंगांचे उत्पादन करणाऱ्या संस्थेने कोणत्या स्वरूपाच्या जबाबदारीकडे दुर्लक्ष केले आहे?

(ब) ते कोणत्या प्रकारचे प्रदूषण करतात?

(क) रंगांचे उत्पादन करणाऱ्या संस्थेने घ्यावयाचा कोणताही एक खबरदारीचा उपाय नमूद करा.

प्र.४. खालील फरक स्पष्ट करा (कोणतेही तीन) : **[१२]**

(१) निर्देशन आणि नियंत्रण

(२) रस्ते वाहतूक आणि रेल्वे वाहतूक

(३) परंपरागत व्यवसाय आणि ई–व्यवसाय

(४) जिल्हा आयोग आणि राष्ट्रीय आयोग

प्र.५. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही दोन) : **[८]**

(१) ग्राहकांचे कोणतेही चार अधिकार / हक्क स्पष्ट करा.

(२) वस्तू विपणन मिश्रणाचे ४ पी (4Ps) स्पष्ट करा.

(३) व्यावसायिक सेवांची कोणतीही चार वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

प्र.६. खालील विधाने सकारण स्पष्ट करा (कोणतेही दोन) : **[८]**

(१) समानतेचे तत्त्व महत्वाचे आहे.

(२) 'योग्य व्यक्ती योग्य जागेवर योग्य मोबदल्यासह' हे कर्मचारी व्यवस्थापनेचे मूलभूत तत्त्व आहे.

(३) व्यवसाय संघटनांनी, पर्यावरण प्रदूषण व पर्यावरणीय असमतोल टाळला पाहिजे.

(४) ग्राहकांच्या हक्काचे संरक्षण करणे हे ग्राहक संघटनांचे ध्येय असते.

प्र.७. खालील प्रश्न सोडवा (कोणतेही दोन) : **[१०]**

(१) ग्राहकांसाठी विपणनाचे असणारे महत्त्व स्पष्ट करा.

(२) उद्योजकाची कार्ये स्पष्ट करा.

(३) शास्त्रीय व्यवस्थापनाची कोणतीही पाच तत्त्वे स्पष्ट करा.

SEAT NUMBER | | | | | | | |

प्र.८. खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा (कोणतेही एक) : **[८]**

(१) विपणनाचा अर्थ काय? विपणनाची कार्ये सविस्तर स्पष्ट करा.

(२) गोदामाचा अर्थ सांगा. गोदामांचे विविध प्रकार स्पष्ट करा.

◆◆◆